31 JUL 2022
लोकमत
जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्तुतीच्या माध्यमातून कुशल मनुष्य बळ



कोल्हापूर : नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील स्तुती उपक्रमाचे उद्घाटन करताना डॉ. प्रदीपकुमार, प्रा. जोगेंद्रसिंग बिसेन, डॉ. आर. जी. सोनकवडे, कुलगुरू डॉ. उद्धव भोसले, प्रा. वाघमारे.

- ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. प्रदीपकुमार यांचे प्रतिपादन
- नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात स्तुती प्रशिक्षण उपक्रम

प्रतिनिधी
कोल्हापूर

भारताची लोकसंख्या अर्ध्याहून अधिक तरुणांची आहे. स्तुती अंतर्गत आधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध आहे. परंतु ते हाताळण्यासाठी कुशल मनुष्यबळाची गरज असल्याने, भारत सरकारने सुरू केलेला स्तुती उपक्रम अतिशय मार्गदर्शक ठरणार आहे, असे प्रतिपादन हैद्राबाद येथील ॲटोमिक मिनरल्स डायरेक्टर, ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. प्रदीपकुमार यांनी केले.

भारत सरकार विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालय प्रायोजित शिवाजी विद्यापीठ व नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित स्तुती उपक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. सात दिवसीय कार्यशाळेसाठी शिवाजी विद्यापीठातील सैफचे समन्वयक डॉ. आर. जी. सोनकवडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. प्रदीपकुमार म्हणाले, डीएसटीच्या उपक्रमाचा फायदा बहुतेक विद्वानांना आणि प्राध्यापकांना होईल. नांदेड येथील मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. उद्धव भोसले अध्यक्षस्थानावरून म्हणाले, स्तुती अंतर्गत प्रशिक्षणाचा उपयोग प्राध्यापक, संशोधक आणि उद्योग क्षेत्रातील व्यक्तींना होणार आहे. सैफचे समन्वयक डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी स्तुती उपक्रम देशभर पोहोचवण्याचे काम केले आहे. डॉ. सोनकवडे म्हणाले, जगात सर्वाधिक तरुण लोकसंख्या भारतात आहे. एकूण लोकसंख्येच्या सुमारे ६६ टक्के लोक ३५ पेक्षा कमी वयाचे आहेत. देशाच्या भविष्यातील तांत्रिक विकासाचा विचार करता हा उपक्रम अतिशय महत्त्वाचा आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाला विशेषत: लातूर, हिंगोली आणि परभणी जिल्ह्यांच्या अंतर्गत भागाशी संपर्क साधायचा होता. त्यामुळे शिवाजी विद्यापीठाने या ठिकाणी या प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन केले असून त्याला खूपच चांगला प्रतिसाद मिळाला. 'अत्याधुनिक उपकरणे वापरून संरचनात्मक वैशिष्ट्यीकरण' या विषयी डॉ. सोनकवडे यांनी मार्गर्शन केले. तसेच शिवाजी विद्यापीठातील सैफ केंद्रात उपलब्ध अत्याधुनिक उपकरणांविषयी माहिती दिली. प्रा. राजाराम माने यांच्या नियोजनाचे कौतुक केले. प्रा. माने म्हणाले, जर संशोधन क्षेत्रात यशस्वी व्हायचे असेल तर त्या क्षेत्रातील शास्त्रीय उपकरणे हाताळणे दुरुस्त करणे आणि त्याचा संशोधनासाठी वापर करणे हे अनिवार्य आहे.

प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्र सिंह बिसेन, कुलसचिव डॉ. सर्जेराव शिंदे, विज्ञान व तंत्रज्ञानविभागाचे अधिष्ठाता डॉ. एल. एम. वाघमारे, समन्वयक राजाराम माने, उपकुलसचिव डॉ. रवी सरोदे यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. अरविंद सरोदे यांनी सूत्रसंचालन केले आणि मान्यवरांचे आभार मानले. या कार्यक्रमाला विद्यापीठ आणि संलग्न महाविद्यालयातील सुमारे १५० संशोधक, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

पुढारी

# ३९ हजार विद्यार्थ्यांनी दिली ऑफलाईन परीक्षा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने मार्च-एप्रिल २०२२ उन्हाळी सत्राअंतर्गत विद्यापीठस्तरावरील परीक्षेअंतर्गत शनिवारी ५४ विषयांच्या परीक्षा झाल्या. विद्यापीठ कार्यक्षेत्रातून सुमारे ३९ हजार १७ विद्यार्थी परीक्षेला बसले. विद्यापीठातर्फे १९ जुलैपासून महाविद्यालय, विद्यापीठस्तरावरील ५६१ परीक्षा सुरू झाल्या आहेत. बीए. बीएस्सी. (आयटी, कॉम्प्युटर सायन्स, शुगर टेक), बीए, एमए., एमबीए, बीई, बी.टेक., बी.फार्म., एम.फार्म., एलएलबी, एलएलएम, बीसीए आदी विषयांच्या परीक्षा झाल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. ए. एन. जाधव यांनी दिली.

पुण्यनगरी

# ‘रसायनशास्त्र’मध्ये ३२ विद्यार्थ्यांचा सहभाग

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागात डीएसटी-पर्स योजनेंतर्गत आयोजित सात दिवसीय व्हॅल्यू ॲडेड कोर्समध्ये रसायनशास्त्र अधिविभागातील ३२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. डॉ. सुशीलकुमार जाधव, डॉ. डी. एस. दगडे, डॉ. ए. व्ही. घुले, डॉ. डी. एस. भांगे, डॉ. डी. एम. पोरे, डॉ. एस. डी. डेलेकर, डॉ. टी. आर. भोसले, डॉ. एस. एस. संकपाळ, डॉ. के. एम. गरडकर यांनी सहभागी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रशिक्षणासाठी प्रा. आर. जी. सोनकवडे, प्रा. के. वाय. राजपुरे व सचिन कलश यांचे सहकार्य लाभले. डॉ. एस. ए. संकपाळ यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले. समारोप समारंभास डॉ. आर. जी. सोनकवडे प्रमुख पाहुणे म्हणून, तर अध्यक्ष म्हणून रसायनशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. के. डी. सोनवणे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
31 JUL 2022 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कुशल मनुष्यबळाची गरज

## प्रा. डॉ. सोनकवडे; 'स्तुती' योजनेंतर्गत कार्यशाळा



कोल्हापूर : प्रा. डॉ. राजेंद्र सोनकवडे यांचा सत्कार करताना प्रा. जोगेंद्रसिंग बिसेन. सोबत प्रा.उद्धव भोसले, प्रा. डॉ. प्रदीपकुमार, प्रा. वाघमारे.

सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. ३०** : देशातील ६६ टक्के लोकसंख्या ही ३५ वर्षांपेक्षा कमी वयाची आहे, देशाच्या भविष्यातील विकासात त्यांचे योगदान महत्त्वाचे असणार आहे. यासाठी कुशल आणि प्रशिक्षित मनुष्यबळ मुबलक असणे गरजेचे असून त्यासाठी 'स्तुती'सारख्या योजना महत्त्वपूर्ण आहेत, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या सैफ केंद्राचे प्रमुख प्रा. डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी केले. विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालय (DST), शिवाजी विद्यापीठ, आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने स्तुती (सिनरजिस्टिक ट्रेनिंगप्रोग्रॅम अँड टेक्नॉलॉजिकल इन्फ्रास्ट्रक्चर) योजनेंतर्गत आयोजित कार्यशाळेच्या उद्घाटन कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी हैदराबाद येथील ऑटोमिक मिनरल्स डायरेक्टोरेटचे ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. प्रदीपकुमार होते.

यावेळी डॉ. सोनकवडे म्हणाले, 'जगात सर्वाधिक तरुण लोकसंख्या भारतात आहे, एकूण लोकसंख्येपैकी ६६ टक्के लोकसंख्या ३५ वर्षांपेक्षा कमी वयाची आहे. देशाच्या भविष्यातील तांत्रिक विकासाचा विचार करता हा प्रशिक्षण कार्यक्रम महत्त्वाचा आहे आणि विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाला विशेषतः लातूर, हिंगोली आणि परभणी जिल्ह्यांच्या अंतर्गत भागाशी संपर्क साधायचा होता. त्यामुळे ठिकाणी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन केले. त्याला चांगला प्रतिसाद मिळाला.

औद्योगिक क्षेत्राचा विकास तेव्हाच होऊ शकेल. ज्यावेळी देशात कुशल आणि प्रशिक्षित मनुष्यबळ मुबलक प्रमाणात उपलब्ध असेल. यासाठीच 'स्तुती'सारख्या योजना महत्त्वाच्या आहेत.

अध्यक्षीय भाषणात डॉ. प्रदीपकुमार यांनी स्तुती उपक्रमाचे कौतुक केले. कुशल मनुष्यबळाची गरज लक्षात घेऊन हे योग्य पाऊल उचलले असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमात विद्यापीठातील आणि संलग्न महाविद्यालयातील सुमारे १५० संशोधक, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी कुलगुरू डॉ. उद्धव भोसले, प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंग बिसेन, कुलसचिव डॉ. सर्जेराव शिंदे, विज्ञान व तंत्रज्ञानविभागाचे अधिष्ठाता डॉ. एल. एम. वाघमारे, समन्वयक राजाराम माने, उपकुलसचिव डॉ. रवी सरोदे यांची प्रमुख उपस्थिती होती.